CC/२०२३-२४/संगणक/Website

**म.वि.स./क-२ (संगणक)**

महाराष्ट्र विधानमंडळाचे www.mls.org.in हे संकेतस्थळ कार्यरत असून त्या माध्यमातून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयासंदर्भातील सर्व माहिती वेबसाईटवर टाकण्याचे काम संगणक कक्षाद्वारे करण्यात येते. सदरहूच्या अनुषंगाने सर्व कक्षांनी निगडीत माहिती संकलित करण्याचे काम संगणक कक्षामार्फत हाती घेण्यात आलेले आहे. सदरहू वेबसाईट अद्ययावत करण्याच्या उद्देशाने या सचिवालयातील सर्व कक्षांशी संबंधित माहिती संगणक शाखेकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. अत: सर्व कक्षांनी त्यांच्याशी संबंधित माहिती scanning न करता Unicode font मध्ये टंकलिखित करुन त्याची सॉफ्ट कॉपी संगणक कक्षाकडे तातडीने पाठवावी.

शाखांकडून प्राप्त झालेली सॉफ्ट कॉपीतील माहिती जशीच्या तशी वेबसाईटवर टाकण्यात येईल. त्यामुळे माहितीच्या अचुकतेची जबाबदारी ही संबंधित कक्षांची व संबंधित अधिकारी यांची राहिल. माहिती देताना त्याची पूर्ण तपासणी करुनच संगणक शाखेकडे पुढील पंधरा दिवसांच्या आत देण्यात यावी. |अ

मान्य झाल्यास सदरहू टिपणीची प्रत सर्व अधिकारी तथा कक्षांना वितरित करण्यात येईल.

**मान्यतेसाठी सादर**

प.वि. [signature] ११/०१/२०२४

अ.स.(श्री काकडे) [signature] ११/०१/२०२४

सह सचिव (श्री साठ्ये) अ प्रमाणे मान्य. [signature] १५/०१/२०२४

**मा. सचिव (१) (कार्यभार)** [signature] १६/१